I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 271-273 e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal OPEN ACCESS Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# आदिवासींची सामाजिक परिस्थिती : एक अध्ययन

डॉ. उज्वला मोकदम

Corresponding Author : ujwala.mokadam@gmail.com

Communicated :20.02.2022 Revision : 15.03.2022 Accepted :25.03.2022 Published: 30.03.2022

**सारांश :**

निसर्गाला आपली आई मानणाऱ्या आदिवासी समुदायाच्या सामाजिक स्थितीचे अध्ययन या संशोधनाद्वारे करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आदिवासींची आर्थिक परिस्थिती त्यांची आरोग्यविषयक परिस्थिती आणि शैक्षणिक परिस्थितीचे निरीक्षण व अवलोकन या संशोधनाद्वारे करण्यात आलेले आहे. की जेणेकरून या समाजाचे लक्ष वेधून त्यांच्या विकासाचे प्रयत्न केले जाईल.

**बीजशब्द :** आदिवासी, निसर्ग, अर्थव्यवस्था, श्रमविभाजन, अनुसूचित जमाती, शैक्षणिक गळती, आश्रम विद्यालय, शिष्यवृत्ती, पुस्तक पेढी आणि सामाजिक परिस्थिती.

**प्रस्तावना :**

आपला भारतीय समाज हा विविधतेने नटलेला आहे. येथे विविध जाती, जमाती, वंश, रूढी, प्रथा, परंपरा, गोत्र इत्यादी बाबतीत विविधता आढळून येते. अशा या विविधतेतील नागरी संस्कृतीपासून अलिप्त राहिलेले संबंधित प्रदेशातील मूळचे रहिवासी म्हणजे आदिवासी होय. आदिवासी सर्वसाधारणपणे जंगलात दुर्गम भागात दऱ्याखोऱ्यात व सुसंस्कृत समाजापासून तुटक असलेल्या प्रदेशात आपले वास्तव्य करीत असतात. प्रगत समाजाचा संपर्क न झालेल्या वैशिष्ट्यपूर्ण चालीरीती संस्कृती आदिवासींमध्ये आढळते. आदिवासी समाज हा मुख्यत्वेकरुन हा डोंगराळ प्रदेशामध्ये राहत असल्यामुळे त्याला निसर्गाविषयी विशेष आवड असल्याचे दिसून येते. त्यामुळे हा आदिवासी समाज निसर्गाची पूजा करतो म्हणजेच निसर्गपूजक असतो. यांच्या सर्व संस्कृती निसर्गाशी निगडित असतात व इतर समाजाशी त्यांचे काहीही देणेघेणे नसते. ते स्वत: निसर्गाच्या सान्निध्यात राहणे पसंत करतात. आदिवासींना एबॉरिजिनस, मूलनिवासी, जनजाति, देशज, गिरिजन अशा अनेक नावांनी ओळखले जाते. अशा आदिवासींचा समावेश भारतीय राज्यघटनेत अनुसूचित जमाती म्हणून केलेला आहे. महाराष्ट्रातील अनुसूचित जमातींची संख्या ४७ आहे. २०११च्या जनगणनेनुसार राज्यात अनुसूचित जमातींची लोकसंख्या १,०५,१०,२१३ (९.३५:) असून त्यांना ७: आरक्षण आहे. भारतात १९९४ पासून ९ ऑगस्ट हा दिवस दरवर्षी आदिवासी दिवस म्हणून साजरा केला जातो. आदिवासी लोक भारताखेरिज जगातील अन्य देशातही आहेत. इसवी सन १९६२ साली शिलॉंग मध्ये आदिवासी समितीच्या परिषदेने आदिवासींची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. ''एका समान भाषेचा वापर करणाऱ्या, एकाच पूर्वजांपासून उत्पत्ती सांगणाऱ्या, एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करणाऱ्या, तंत्र शास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेल्या, अक्षर ओळख नसलेल्या व रक्त संबंधावर आधारित सामाजिक व राजकीय रितीरिवाजाप्रमाणे पालन करणाऱ्या एक जिनसी गटाला आदिवासी समाज असे म्हणतात.''

एकेकाळी हा समाज अत्यंत प्रगत आर्थिक दृष्ट्या सक्षम होता. परंतु भारतामध्ये इंग्रजांचे राज्य आल्यानंतर या समाजाचे इंग्रजांनी फार मोठ्या प्रमाणात शोषण केले त्यामुळे आदिवासी समाजाची आर्थिक प्रगती खालावली. आदिवासी समाज निसर्गाची पूजा करतो म्हणजेच निसर्गपूजक असतो. यांच्या सर्व संस्कृती निसर्गाशी निगडित असतात व इतर समाजाशी त्यांचे काही देणेघेणे नसते ते स्वत: निसर्गाच्या सान्निध्यात राहणे पसंत करतात.

**आदिवासींची आर्थिक स्थिती :–**

अन्न वस्त्र निवारा शिक्षण आरोग्य या मानवाच्या मूलभूत गरजांपैकी अन्नाचा प्रश्न हा आदिवासी समाजात सामाजिक प्रश्न समजला जातो व त्याप्रमाणे तो तसा हाताळला ही जातो. आदिवासी अर्थव्यवस्थेत पैशांचे चलन नाही तर वस्तुंची देवाण–घेवाण असते. आदिवासी अर्थव्यवस्थेत गटवार श्रम विभाजनाचा व धंदेभिन्न सामाजिक गटांचा अभाव असतो. सर्व लोक सर्व प्रकारची कामे करतात. त्याच बरोबर आदिवासी अर्थव्यवस्थेत उत्पादनाची साधने प्राथमिक स्वरूपाची असतात. टोपल्या तयार करणे, सापळे, पाटा–वरवंटा, जाळी, आकडे, दोर, टोकदार व धारदार दांडकी, हातोडा, कोयता यासारखी प्राथमिक अवजारे वापरतात. तसेच लाकूड कटाई, वनांमधून कंदमुळे ,फळे, तंतू, मध, औषधी वनस्पती गोळा करणे येथील मुख्य

लोकांचे मुख्य व्यवसाय असतात. यांचे उत्पादन कमी असल्यामुळे बाजारपेठाही नसतात. जो तो आपल्या उत्पादनाचा उपभोग घेतो.आदिवासी समाजातील श्रमविभाजन व्यावसायिक सामाजिक गटवारी वर आधारलेले नसते तर लिंगभेदावर आधारलेले असते. प्रत्येक व्यक्तीस शेती, मासेमारी, सुतारकि इत्यादी ते व्यवसाय कमी जास्त प्रमाणात येत असतात. आदिवासी उद्योगांना तांत्रिक व धार्मिक क्रियांचा फार मोठा जवळचा संबंध असतो. शेती, मासेमारी किंवा होड्यांचे उत्पादन, प्रवास इत्यादींची धार्मिक विधी निगडित असतात. वस्तुविनिमयात गिऱ्हाईक कोण आहे, त्याचा दर्जा काय आहे इत्यादी घटक लक्षात घेतले जातात. काही आदिवासी समाजात मात्र काही पदार्थांचा चलन म्हणून उपयोग करतात. निकोबार बेटात नारळ, आफ्रिकेत कवड्या किंवा भाल्याच्या पाती, फिजी बेटात व्हेल माशाचा दात, भारताच्या अरुणाचल प्रदेशात मिथान नावाचा प्राणी इत्यादींचा चलन म्हणून उपयोग करण्यात येतो. विवाहात व धार्मिक समारंभात दान देण्यासाठी अशा चलनाचा उपयोग होतो. अशाप्रकारे आदिवासींची आर्थिक परिस्थिती जेमतेम असते असते.

**आदिवासींची आरोग्यविषयक स्थिती :—**

आदिवासी समाजाचे संपूर्ण जग किंवा विश्व म्हणजे निसर्गच असतो. आदिवासी समाज हा प्रगत समाजापासून भौगोलिक दृष्ट्या दूरवर वास्तव्यास असल्यामुळे त्यांना २४ तास अतिशुद्ध हवा मिळत असते. त्याचबरोबर कातळावरून वाहणारे नितळ शुद्ध पाणी त्यांना मिळत असते. पावसाळ्यानंतर जलाशयातील पाणी आणल्यावर त्या पाण्याला अनेकदा गरम करून शुद्ध करून पिले जाते. चूल पेटवण्यासाठी लाकडे गोळा करताना, शेळ्यांसाठी हिरवा पाला आणताना, पाणी वाहून आणताना, आणि रानातून मिळणारे विविध खाद्यपदार्थ आणताना त्यांची अविरत पायपीट सुरू असते. ढोरवाटा, टेकड्या, घाट अशा भागातून ते सतत चालत असतात त्यामुळे त्यांचे शरीर अतिशय काटक असते. दिसायला ते फारच क्षीण आणि अडकलेले दिसतील. पण प्रचंड चिवट असतात. अस्थिरोग, श्वसन रोग असले प्रकार त्यांना सहसा होत नाही. हृदयविकाराचा तर प्रश्नही उद्भवू शकत नाही बराच काळ अन्नपाण्यावाचून चालत राहिल्यामुळे शरीराचा चिवटपणा अधिकच वाढतो. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आहार आदिवासी लोक बऱ्याच प्रमाणात कंदमुळे खातात. त्यांचे नित्याचे जेवण म्हणजे डाळ भात, कंदमुळे आणि हिरवी पालेभाजी ज्यावर कोणत्याही कीटकनाशक रासायनिक खतांची फवारणी केलेली नाही. तसेच जलाशयातून मासे आणून मासाहार करतात त्यामुळे त्यांना पौष्टिक आहार मिळतो व त्यामुळे त्यांचे आरोग्य ही खणखणीत असते.

**आदिवासींची शैक्षणिक स्थिती :—**

आदिवासी समाज हा सहसा दुर्गम भागात डोंगर कपाऱ्यात किंवा रानावनाच्या कडेला राहत असतो. तिथून जवळच एखादे गाव सात आठ किमी अंतरावर असते व एखादी छोट्या आकाराची शाळा या गावात असते. या शाळेत आदिवासींची मुले शिक्षण घेत असतात. असे म्हणण्यापेक्षा त्यांना ओढून—ताणून शिक्षण घेण्यासाठी विविध प्रलोभने देऊन शाळेत आणण्याचे महत्वाचे कार्य शिक्षकांद्वारा केले जाते. शासनाच्या सर्वांना मोफत शिक्षण या योजनेतर्फे आठवीपर्यंत शिक्षण मोफत केले आहे. व विद्यार्थ्यांना वर्गानुसार पाठ्यपुस्तके, गणवेश, पौष्टिक आहार मोफत आहे. या आहारात आठवड्यातून दोन दिवस हरभऱ्याची उसळ आणि भात, दोन दिवस खिचडी आणि भाजी आणि दोन दिवस साधे वरण भात असतो. याशिवाय शनिवारी राजगिराचा लाडू, खोबरं आणि थोडे शेंगदाणे प्रत्येक विद्यार्थ्यांयांना दिले जातात. याचबरोबर शाळेत विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी घसरगुंडी, झोपाळा असतो. पटांगणात मुले लंगडी, कबड्डी खेळतात. विद्यार्थ्यांसाठी इत्यादी सोयी सुविधा असूनही आदिवासी पालक मात्र आपल्या मुलांना शाळेत पाठविण्याबाबत उदासीन असतात. इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण झपाट्याने वाढलेले दिसून येते. आदिवासी मुले शाळेतून घरी गेली की त्यांना बकऱ्या चरायला, लांबून पाणी भरायला जाणे अशी कामे सांगितली जातात. आदिवासी पालकही आपल्या मुलांच्या अभ्यासाबाबत फारसे जागरूक नसतात त्यांना असे वाटते की शाळेत जो अभ्यास झाला तितकाच अभ्यास करायचा घरी आल्यावर गृहपाठ कशाला करावा ? त्यामुळे मुलांचे आणि अभ्यासाचे काहीही देणेघेणे नसते. अनेकदा शाळाही चुकवली जाते. शासनाने या मुलांच्या शिक्षणाकरीता अनेक योजना केलेल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे.

**अनुसूचित जमाती (आदिवासी) समुदायाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी योजना :—**

- अनुसूचित जमातीच्या मुलींकरिता वस्तीगृह.
- मुलांकरिता वस्तीगृह
- जमाती उपयोजना क्षेत्रात आश्रम विद्यालय
- आदिवासी क्षेत्रात व्यावसायिक प्रशिक्षण
- मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती
- प्रशिक्षण आणि अन्य कार्यक्रम
- पुस्तक पेढी उपक्रम

- उच्च शिक्षणाकरिता राष्ट्रीय विदेशी शिष्यवृत्ती आणि यात्रा अनुदान.

अशाप्रकारे आदिवासींकरिता शिक्षणाच्या अनेक योजना राबविल्या जातात. असे असूनही काही भागातील आदिवासी मुले शिक्षणाबाबत उदासीन दिसून येतात तर काही भागात मात्र शिक्षणाचा प्रसार झालेला दिसून येतो.

**निष्कर्ष :**

आदिवासींचे एकंदरीत अध्यायन केले असता असे दिसून आले की आदिवासी समाज हा शिक्षणाच्या बाबतीत जागरूक नाही किंवा त्यांच्यासाठी असणाऱ्या योजनांची अंमलबजावणी योग्यप्रकारे केली जात नाही. याचा परिणाम त्यांच्या आर्थिक जीवनावर होतो. कारण श्रम करण्याशिवाय उत्पन्नाचा दुसरा कुठलाही मार्ग त्यांच्याकडे उपलब्ध नसतो. त्यामुळे आदिवासींची आर्थिक परिस्थिती सुद्धा हलाखीची आहे. आदिवासींची आरोग्यविषयक परिस्थिती एकंदरीत उत्तम असलेली दिसून येते. आदिवासी समाज व त्यांची संस्कृती भारतीय समाजाचे अविभाज्य अंग आहे. त्यामुळे शासनाने व समाजाने या समाजाकडे विशेष लक्ष देऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**

डॉ. काल्हेकर ज्ञानेश्वर, आदिवासी मराठी साहित्य एक अभ्यास, स्वरूप प्रकाशन २००९

डॉ. गारे गोविंद, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे २००९

डॉ. चव्हाण सीमा, शासकीय उपाययोजना आणि आदिवासी समाज, लुलु डॉट कॉम.

डॉ. प्रदीप आगलावे, भारतीय समाज संरचनात्मक प्रश्न आणि सामाजिक समस्या, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर